| MHAH250031772021 | | | |
|---|---|---|---|
| | खटला दाखल दि. | : | १४/१२/२०२१ |
| | खटला नोंदणी दि. | : | १४/१२/२०२१ |
| | निकालाचा दि. | : | ०८/०४/२०२६ |
| | कालावधी | : | ४ व. ३ म. २५ दि. |

**भाग अ**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी (न्यायालय क्र. २), पारनेर, ता. पारनेर, जि. अहमदनगर यांचे न्यायालय**

(**पिठासीन अधिकारीः निलेश श्रीपाल सबनीस**)

**नियमीत फौजदारी खटला क्रमांक ७३८/२०२१** **निशाणी क्र. ३६**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत– पोलीस ठाणे अंमलदार,<br>पारनेर पोलीस स्टेशन, ता. पारनेर, जि. अहमदनगर. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | | श्री. एस.ए. पटेकर |
| **विरूध्द** | | |
| आरोपी | | १. साहेबराव तुकाराम चौधरी, वय-६४ वर्षे,<br>२. आश्रू तुकाराम चौधरी, वय-६३ वर्षे,<br>दोघे रा. लंकेवाडी, वडझीरे, ता.पारनेर,<br>जि. अहमदनगर |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | श्री. पी.एस. सोमवंशी |

**भाग ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | | १८/११/२०२० |
| गुन्हा दाखल दिनांक | | २०/११/२०२० |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | | १४/१२/२०२१ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | | १६/०६/२०२३ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | | १३/०८/२०२४ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | | ०८/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | | ०८/०४/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | | — |

## आरोपींची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीना वर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | साहेबराव तुकाराम चौधरी | २३/११/२०२० | २३/११/२०२० | ३२४, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. | निर्दोष | — | — |
| २ | आश्रू तुकाराम चौधरी | २३/११/२०२० | २३/११/२०२० | ३२४, ५०४, ५०६ सह ३४ भा.दं.वि. | निर्दोष | — | — |

## भाग क

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | अनिल दादाभाऊ ठुबे | पंच | १८ |
| २. | शिवाजी बबन रेपाळे | पंच | २. |
| ३. | बाळु तुकाराम चौधरी | फिर्यादी | ३. |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|
| २१ | फिर्याद |
| ३१ | आरोपी व फिर्यादी यांच्यामधील तडजोड |
| ३३ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | १/२०२४ | एक हातात मावेल एवढा दगड |

## न्यायनिर्णय

( दि. ०८/०४/ २०२६ रोजी घोषित )

उपरोक्त आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम (यापुढे थोडक्यात भा.दं.सं.) ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेऊन खटला चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे**,

दिनांक १८/११/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजणाच्या सुमारास लंकेवाडी, वडझीरे, ता.पारनेर येथे फिर्यादी बाळु तुकाराम चौधरी यांच्या घरासमोर त्यांच्या मालकीच्या शेतातील कांद्याचे पिकाला पाणी देण्याच्या कारणावरुन आरोपींनी फिर्यादीस शिवीगाळ करुन, आरोपी क्र.१ याने फिर्यादीचे पाय धरुन खाली पाडले व आरोपी क्र.२ याने ओटयाच्या कडेला पडलेला दगड फिर्यादीच्या कपाळावर मारुन दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन फिर्यादीने पारनेर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३. फिर्यादीवरुन पोलिसांनी गुन्हा क्र.I–१०९८/२०२० भारतीय दंड विधानचे कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदवला. गुन्हयाचा तपास पो.हे.कॉ. एस.जी.रोकडे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळाचा पंचनामा केला, मुद्देमाल पावती तयार करून मुद्देमाल जमा करून फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र मिळणेबाबत पत्रव्यवहार केला. तपासाअंती आरोपींविरुद्ध पुरेसा पुरावा आल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र सादर केले.

४. आरोपींवर नि. क्र.१२ अन्वये भारतीय दंड विधानचे कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींनी ते नि. क्र.१३ व १४ अन्वये नाकबूल केले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा आल्याने आरोपींची जबानी फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ (१) (ब) नुसार नि.३४ व ३५ वर नोंदविण्यात आली.

६. सरकारी वकिलांचा युक्तिवाद, आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद, उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन न्यायालयाच्या निदर्शनास खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष खालील कारणांसहीत नोंदविले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक १८/११/२०२० रोजी सकाळी १०.३० वाजणाच्या सुमारास लंकेवाडी, वडझीरे, ता. पारनेर येथे फिर्यादीच्या घरासमोर आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीचे पाय धरुन खाली पाडले व ओटयाच्या कडेला पडलेला दगड फिर्यादीच्या कपाळावर मारुन इच्छापूर्वक दुखापत केली व त्यायोगे भा.द.वि कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वरील नमूद तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळ करुन त्यांचा जाणुनबुजून अपमान करुन सार्वजनिक शांतता भंग करण्यास त्यांना प्रक्षोभित केले आणि त्यायोगे भा.दं.वि.कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वरील नमूद तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपींनी आपसात संगनमत | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | करून फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्यायोगे भा.दं.वि. कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| ४. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता केली. |

## कारणमिमांसा

७. आरोपींविरुद्ध ठेवलेले दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे वरील भाग–क मध्ये नमुद एकुण ३ साक्षीदार यांचा जबाब नोंदवला.

८. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला व आरोपीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की, योग्य त्या गुणदोषांवर सदर केसचा निकाल व्हावा. आरोपीतर्फे त्यांच्या विधिज्ञांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे सांगितले की, आरोपीविरुध्द सदर केसमध्ये कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे.

## मुद्दा क्र. १ ते ४ करीता–

९. सरकार पक्षाची कथने पाहता फिर्यादी हा महत्वपूर्ण साक्षीदार आहे. फिर्यादी बाळु चौधरी यांच्या निशाणी क्र. २० वरील कथनांनुसार साहेबराव चौधरी व अश्रू चौधरी त्याचे सख्खे भाऊ आहेत. ते त्यांच्या शेजारी राहतात. त्यांची समाईक विहीर आहे. दि.१८.११.२०२० रोजी घटना घडली. ते सकाळी एकटे पाणीभरायला शेतामध्ये कांद्याच्या पिकाला पाणी द्यायला गेले होते. त्यानंतर साहेबराव व अश्रू आले व त्यांनी त्याला कांद्याला पाणी देण्याच्या कारणावरुन शिवीगाळ केली. तु पाणी भरायचे नाही, आम्हाला पाणी भरायचे आहे असे ते म्हणाले. त्यानंतर मोटर बंद करुन ते घरी आले. त्यावेळी ते व त्यांची पत्नी घरी होते. साहेबराव व अश्रू यांनी घरी येवुन त्यांना परत पाणी भरण्याच्या कारणावरुन शिवीगाळ केली. शिवीगाळ करता करता साहेबरावने त्यांचा पाय ओढला व ते खाली पडले आणि अश्रूने

दगड त्यांच्या डोक्यात मारला. तो दगड त्यांच्या कपाळाला मारला. त्यांना त्यामुळे मोठी जखम झाली होती. ते त्यानंतर वडझीरे येथील एरंटे डॉक्टरांकडे गेलेव त्यांना त्यांनी टाके लावले. जास्त दुखत असल्याने त्यांना त्यावेळी सुचत नव्हते. दोन दिवसांनी ते पोलीस स्टेशनला आले व फिर्याद दिली. त्यांना फिर्याद दाखवण्यात आली असता त्यावर त्यांची सही असल्याचे व त्यातील मजकुर बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर पोलीस पंचनाम्यासाठी आले होते व त्यांना घटनास्थळ त्यांनी दाखवले होते. ज्या दगडाने त्यांना मारले तो दगड त्यांना दाखवल्यास ते ओळखु शकतात. त्यांना ज्या दगडाने मारहाण केली तो दगड आर्टीकल अ दाखवण्यात आला असता तो दगड तोच असल्याचे व पोलीसांनी तो त्यांच्यासमक्ष जप्त केल्याचे त्यांनी सांगितले.

१०. फिर्यादीने त्यांच्या उलटतपासात मान्य केले की त्याचे व आरोपींमध्ये विहीरीच्या पाण्याच्या हिश्यावरुन कायम वाद होत असतात, त्यांना घटनेची तारीख व वेळ सांगता येणार नाही. फिर्यादीने मान्य केले की घटनेचे दिवशी आरोपींनी त्याचे पाय ओढुन दगड मारला नाही व घटनेचे दिवशी पोलीस आले होते. फिर्यादीने सांगितले की पोलीसांनी त्याचा जबाब घेतला नव्हता. फिर्यादी मान्य करतो की आरोपींनी त्याला शिवीगाळ केली नाही व त्याला दगडाने मारहाण झाली नव्हती व पोलीसांनी दगड जप्त करुन त्याला दाखवला नव्हता. फिर्यादीने सांगितले की त्याला जखम झाली नव्हती. फिर्यादीने पुन्हा सांगितले की त्याचा पाय घसरुन त्याला जखम झाली होती. फिर्यादीने मान्य केले की त्याची आरोपींविरुध्द काही तक्रार राहीली नाही व पोलीसांकडे त्याने गैरसमजुतीने फिर्याद दिली.

११. सा.क्र.१ अनिल ठुबे यांच्या नि.१८ वरील कथनांनुसार दि.२०/११/२०२० रोजी त्याला पोलीसांनी बोलावले नव्हते. त्यादिवशी शिवाजी बबन रेपाळे त्याच्यासोबत नव्हते. पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी जाण्याबाबत कल्पना दिली नव्हती. त्यादिवशी पोलीसांनी त्याची सही घेतली नाही व घटना काय होती हे माहीत नाही. पोलीसांनी त्याच्यासमोर काही लिहीले नाही. फिर्यादीने त्याच्यासमक्ष घटनास्थळ दाखवले नव्हते. त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला असता त्यावर त्याची सही नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे उलटतपासामध्ये विचारता येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना

देण्यात आली. परंतु, त्यामधून देखील अभियोग पक्षास सहाय्यभूत ठरेल असे काहीही अभिलेखावर आलेले नाही.

१२. सा.क्र.२ शिवाजी रेपाळे यांच्या नि.१९ वरील कथनांनुसार दि.२०/११/२०२० रोजी त्याला पोलीसांनी बोलावले नव्हते. त्यादिवशी त्याच्यासोबत कोणी नव्हते. पोलीसांनी त्याच्यासमक्ष पंचनामा केला नाही व काही जप्त केले नाही. त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला असता त्यावर त्याची सही नसल्याचे व त्यात काय लिहीले हे त्याला माहीत नसल्याचे त्यांनी सांगितले. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे उलटतपासामध्ये विचारता येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. परंतु, त्यामधून देखील अभियोग पक्षास सहाय्यभूत ठरेल असे काहीही अभिलेखावर आलेले नाही.

१३. आरोपींतर्फे नि.३३ वरील घटनास्थळ पंचनामा जरी मान्य केला असला तरी वरील फिर्यादीचा व पंच साक्षीदार यांच्या पुराव्याचा विचार करता त्यांनी अभियोग पक्षास सहाय्यक ठरेल असे कोणतेही कथन केलेले नाही. फिर्यादीने सरतपासात आरोपींनी त्यास शिवीगाळ केल्याचे व साहेबरावने त्याचा पाय ओढला व ते खाली पडले आणि अश्रूने दगड त्याच्या कपाळाला मारला व त्यामुळे त्याला मोठी जखम झाली आणि डॉक्टराने त्यांना टाके लावले असल्याचे व फिर्यादमधील मजकुर बरोबर असल्याचे आणि फिर्यादवरील सही त्याची असल्याचे तसेच घटनास्थळ त्याने पोलीसांना दाखवल्याचे आणि ज्या दगडाने त्याला मारहाण केली तो दगड पोलीसांनी त्याचेसमक्ष जप्त केल्याचे जरी सांगितले असले व तो दगड तोच असल्याचे जरी सांगितले असले तरी उलटतपासात फिर्यादीने त्याने केलेल्या सरतपासातील कथनांबाबत पुर्णपणे विरोधी कथन केले आहे. त्यानंतर सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा फेरतपास घेतला असता त्यांना सरतपासात सांगितलेला मजकुर खरा की उलटतपासातील सांगितलेला मजकुर खरा असे विचारले असता फिर्यादीने उलटतपासात सांगितलेला मजकुर खरा असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे फिर्यादीने जरी सरतपासात आरोपींविरुध्द कथने केली असली तरी उलटतपासात फिर्यादीने सरतपासाशी सुसंगत कथने केली नाहीत. तसेच अभिलेख पाहता प्रस्तुत केसमध्ये दोषारोपपत्रात वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल नाही. एकंदरीत साक्षीदारांचा पुरावा पाहता भारतीय दंड विधान मधील

कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ खालील गुन्हे हे आरोपींविरुध्द शाबीत होत नाहीत. येथे हे नमूद करणे महत्वाचे आहे की, निशाणी क्र.३१ वर फिर्यादी व आरोपी यांनी त्यांच्यामध्ये तडजोड झाली असल्याची पुरसिस दाखल केली होती. फिर्यादी यांची साक्ष अभियोगपक्षासाठी महत्वाची होती. मात्र त्यांची साक्ष पाहता, आरोपींविरुद्ध गुन्हा शाबीत होण्याइतपत सबळ पुरावा आलेला नाही. सबब सदरची केस आरोपींविरुद्ध संशयापलिकडे सिध्द होत नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे. मुद्दा क्र.१ ते ३ वर नोंदविलेले निष्कर्ष विचारात घेता, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द केस सिध्द केलेली नाही असे माझे मत आहे. त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करणे गरजेचे आहे. सबब मुद्दा क्र.४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१– साहेबराव तुकाराम चौधरी व आरोपी क्र.२– आश्रू तुकाराम चौधरी, दोघे रा. लंकेवाडी, वडझीरे, ता.पारनेर, जि. अहमदनगर यांना भारतीय दंड विधान, १८६० मधील कलम ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र. १ आणि २ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ नुसार प्रत्येकी रुपये १५,०००/– चे बंधपत्र व त्याच रकमेचा जामीन देण्याची पुर्तता करावी.

४. जप्त मुद्देमाल एक हातात मावेल एवढा दगड मूल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2026.04.08 17:23:13 +0530

( डॉ. निलेश श्रीपाल सबनीस )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
न्यायालय क्र.२, पारनेर

दि. ०८/०४/२०२६